MAHAMUL03014/13/1/2012-TC
Special Issue No. 1, March 2018

ISSN : Online : 2320-8341
Print : 2320-6446

# RESEARCH FRONT

An International Multidisciplinary Research Journal




# Social and Economic Justice-
# Past, Present and Future

Prin. Dr. C. J. Khilare
Chairman

Mr. S. M. Mahajan
Editor

ISSN (Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341


| | | |
|---|---|---|
| 23 | Pre-Primary Education And Justice For Anganwadi Workers **Prof. Mrs. Shamala R. Mane** | 110-113 |
| 24 | Effect of Family Type And Gender on Emotional Maturity Among Undergraduate Students **Prof. Pramila A. Surve, Prof. Ramesh S. Kattimani** | 114-118 |
| 25 | Consumer And Consumer Protection Act ,1986 : Issues And Challenges **Smt. Sampada S. Lavekar** | 119-123 |
| 26 | Gender Inequality In India **Prof. Shobha Sambhoji** | 124-125 |
| 27 | हिंदी साहित्य में अभिव्यक्ति स्वातंत्र्य **श्री काकासाहेब बापूसाहेब भोसले** | 126-127 |
| 28 | कन्हैयालाल माणिकलाल मुंशी के 'युधिष्ठिर' उपन्यास में प्रतिबिंबित धार्मिक एवं न्यायिक यथार्थता **देवकाते भागवत भगवान** | 128-131 |
| 29 | चित्रा मुद्गल के 'प्रतिनिधि कहानियों' में ग्राम्य और शहरी जीवन के विषमता का यथार्थ दर्शन **कांबळे श्रावण आबा** | 132-134 |
| 30 | नागार्जुन के काव्य में युगीन विषमता और सामाजिक आस्था एवं विश्वास के स्वर **लेफ्टनंट डॉ.रविंद्र पाटील** | 135-137 |
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर याची सामाजिक विकासाची मीमांसा **प्रा. डॉ. वासुदेव डोंगरदिवे** | 138-146 |
| 32 | महिला आरक्षणाचे राजकारण आणि स्त्रियांचा राजकीय सहभाग-समतेच्या संदर्भात **प्रा. सौ. सुपेकर व्ही. पी.** | 147-150 |
| 33 | 'मूलभूत हक्क आणि सामाजिक न्याय' **प्रा. सुहास निर्मले** | 151-153 |
| 34 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पुणे करार : एक चिकित्सक अभ्यास **डॉ. विनोद संभाजी सोनवणे** | 154-157 |
| 35 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान : 'स्त्री' च्या सामाजिक न्यायासाठी **डॉ. श्रीमती सिंधू जयवंत आवळे** | 158-160 |
| 36 | 'राजा राममोहन रॉय यांनी सतेप्रथेविरूध्द मिळविलेला न्याय' **प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम** | 161-164 |
| 37 | महिलांना समान न्याय व पंचायत राज्यातील त्यांचे योगदान **प्रा. भाऊसाहेब खंडू सांगळे** | 165-167 |
| 38 | पंचायतराज व्यवस्थेमधून महिला सबलीकरण : एक सामाजिक न्याय प्रक्रिया **प्रा. सचिन शंकर ऑवाळ** | 168-170 |
| 39 | भारतातील लिंग आधारित भेदभाव आणि न्याय **प्रा. रावसहेब सटवा कांबळे** | 171-175 |
| 40 | हिंदू स्त्रियांचे वैवाहिक हक्क आणि न्याय'' **प्रा. रजनी कारदगे** | 176-178 |
| 41 | मानवी हक्क आणि शिक्षण **प्रा. अडसरे व्ही. बी.** | 179-181 |
| 42 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक न्याया बाबतचे विचार **प्रा. नदाफ बी. आर.** | 182-183 |
| 43 | आर्थिक कल्याण : सामाजिक न्यायाचा आधार **कुबेर दिनकर दिंडे** | 184-187 |
| 44 | विचारेमाळ झोपडपट्टीतील बालकामगार आणि सामाजिक न्याय **प्रा. कन्नाडे ममता कार्तिक** | 188-191 |
| 45 | शिवकालीन न्यायव्यवस्था **प्रा. डॉ. चंद्रकांत गिरी** | 192-195 |
| 46 | शिक्षणाचा अधिकार **प्रा. डॉ. गावडे एस. एम.** | 196-201 |
| 47 | अहमदनगर जिल्हयातील कम्युनिस्ट पक्षाचे जायकवाडी धरणग्रस्तांच्या लढयातील योगदान **प्रा. विधाटे गणेश शंकर** | 202-208 |
| 48 | पांगिरे प्रकरण (काशीबाई हणबर) **प्रा. डॉ. कोळसेकर मनोहर सुबराव** | 209-210 |
| 49 | शिक्षणाचा मुलभूत अधिकार आणि बालक हक्क धोरण **श्री अजितकुमार भिमराव पाटील** | 211-220 |
| 50 | स्त्रीः ''धर्म आणि न्याय'' **प्रा. डॉ. नंदिनी रविंद्र रणखांबे** | 221-223 |
| 51 | सामाजिक सुधारणा चळवळीचे अग्रदूत जगन्नाथ शंकरशेट **प्रा. उमेश गणेशराव जांभोरे** | 224-227 |
| 52 | जागतिकीकरण व न्यायः काही निरीक्षणे **प्रा. टी. वाय.रणदिवे** | 228-230 |

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# महिलांना समान न्याय व पंचायत राज्यातील त्यांचे योगदान

**प्रा. भाऊसाहेब खंडू सांगळे**
इतिहास विभाग प्रमुख
अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर जि. पुणे
bksangale26@gmail.com

## प्रस्तावना

कर्नाटक राज्यात पंचायत राज्य संस्थामध्ये सर्वप्रथम १९८५ मध्ये २५: जागा स्त्रियांसाठी आरक्षित ठेवण्याचा कायदा केला.१९९१ मध्ये केरळमध्ये स्त्रियांसाठी ३०: जागा स्थानिक संस्थामध्ये राखीव ठेवण्यात आल्या त्या आधी १९९० मध्ये भारतात प्रथम महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी ३०: आरक्षण ठेवण्यात आले. पुढे १९३३ मध्ये ३३: आणि आता महिलांना ५०: आरक्षण स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ठेवून पुरूषांप्रमाणे स्त्रियांना समान न्याय देण्यात आलेला आहे. त्यामुळे त्यांच्या राजकिय, सामाजिक व आर्थिक सहभागाचे प्रमाणही वाढले आहे.

## - महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सहभाग

१९८८ च्या नॅशनल परस्पेक्टीव्ह प्लॅन फॉर वूमन या अहवालात स्थानिक शासनात स्त्रियांना ३०: जागा राखीव ठेवण्याची शिफारस करण्यात आली. त्याला अनुसरून केंद्र सरकारने राज्य सरकारांना एका पत्रकाद्वारे पंचायत राज्य संस्थामध्ये कसे प्रतिनिधीत्व देता येईल हे पाहण्यास सांगितले, त्यानुसार भारतात प्रथमच महाराष्ट्रात १९९० मध्ये महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३०: आरक्षण ठेवण्यात आले. पुढे १९९३ मध्ये महिलांच्या सबलीकरणासाठी घटना दुरूस्ती करण्यात आली त्यानुसार महिलांना पंचायत राज्य संस्थेत ३३: आरक्षण देण्यात आले. २०११ पासून तर हे आारक्षण ५०: करून महिलांना खऱ्या अर्थाने सामाजिक व राजकिय दृष्टया समान न्याय देण्यात आलेला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना पंचायत राज्यव्यवस्थेत सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. या समान आरक्षण संधीचा लाभ महिला उठवत आहेत. त्यांचा राजकीय सहभाग त्यामुळे वाढत आहे. राजकीय प्रक्रियेतील महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी महिला आरक्षणाची मर्यादा ३३ टक्क्यावरून ५०: करण्याचे विधेयक प्रस्तुत आहे. पण त्या आधीच महाराष्ट्रासह काही घटक राज्यांनी पंचायत राज्य व्यवस्थेत महिला आरक्षण ५०: केले आहे.

## नवीन राजकीय संस्कृतीचा उदय

आज भारतात १७ लाखांपेक्षा जास्त महिला ग्रामीण स्तरावर निवडून येऊन राजकीय व्यवस्थेत प्रतिनिधीत्व करत आहे. ग्रामीण भागातील लाखो महिला या त्यांच्या सामाजिक चौकटीतून बाहेर पडून सार्वजनिक जीवनाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होत आहेत. गावाचा, तालुक्याचा, जिल्हयाचा व शहरांचा कारभार पाहत आहेत, ही घटना क्रांतीकारकच म्हणावी लागेल. या बदलामुळे एका नवीन राजकीय संस्कृतीचा विकास होत आहे. देशात १७ लाखांपेक्षा जास्त महिला या पंचायत राज संस्थांमध्ये निवडून आल्या आहेत. एवढी महिला प्रतिनिधींची संख्या जगातील कोणत्याही देशात पाहावयास मिळत नाही. ग्रामीण स्तरावर महिलांची एवढी मोठी भागीदारी सामुदायीक जीवन व संस्कृती मध्ये बदल घडवून आणत आहे.

ISSN (Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## ग्रामीण महिला नेतृत्वाचा उदय

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना आरक्षण मिळाल्याने देशातील अनेक महिला सत्ता व राजकारणात येत आहेत. शेतकरी, बहुजन, अनुसूचित जाती व जमाती, इतर मागास वर्ग, उपक्षित महिला या आरक्षण प्रक्रियेमुळे पंचायत व्यवस्थेत सहभागी होऊन निवडून येत आहेत. यामुळे ग्रामीण भागातील सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा यापासून वंचित राहिलेल्या कुटूंबातून महिला नेतृत्व उभे राहत आहे. सरपंच, सभापती, जिल्हापरिषद अध्यक्ष या पदावर निर्वाचीत होत आहेत. त्यांच्याकडे या स्थानिक संस्थांचे नेतृत्व आलेले आहे. मागील तीन दशकात महिला नेतृत्वाने ग्रामीण भागात आपली एक वेगळी ओळख निर्माण केलेली दिसते.

## निर्णय प्रक्रियेत सहभागी

पंचायत व्यवस्थेत निर्माण झालेल्या महिला नेतृत्वाने प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत सक्रीय सहभागी होऊन विविध समाजोपयोगी कामांमध्ये हिरीरीने पुढाकार घेतलेला आढळतो. ग्रामीण भागातील स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा, शिक्षण हे प्रश्न अग्रक्रमाने मांडून पुढे रेटलेले दिसतात. महाराष्ट्र सरकाराच्या ग्रामस्वच्छता अभियानाची यशस्वीता ही महिला प्रतिनिधीच्या सहभागाच्या फलश्रुती म्हणावी लागेल. बाजारपेठा, दवाखाने, दळणवळणाच्या सोयी, जुगारबंदी, दारूबंदी इ. उपक्रम महिला प्रतिनिधीनी राबविलेले दिसतात. पाणी इंधन इ. स्त्रियांशी निगडीत असलेल्या गरजा शोधून त्या सोडविण्यासाठी महिलांना संघटीत केले आहे. पंचायत राज व्यवस्थेत मिळालेली सहभागाची संधी महिला आपल्या विकासासाठी वापरत आहेत. त्यामुळे त्यांचे राजकीय सबलीकरण होत आहे.

## हक्कांबाबत जागृती

स्थानिक स्वराज्य संस्थांतील सहभागामुळे महिला त्यांच्या हक्कांबाबत जागृत होत आहेत. त्यांच्यावर होत असलेल्या अन्याय व शोषणाविरूध्द आवाज उठवत आहेत. त्यांच्यात त्यासाठी हिंमत व आत्मविश्वास निर्माण होत असून देशाच्या रचनात्मक कार्यात त्यांची भागीदारी वाढत आहेत. ग्रामीण भागातील महिला सक्षम बनत आहेत. पुरूष प्रतिनिधी बरोबर बसून सार्वजनीक चर्चेमध्ये सहभागी होत आहेत, की ज्यामुळे महिलांच्या सक्षमीकरणास व सबलीकरणास मोठी चालना मिळत आहे. गावामध्ये सरपंच म्हणून झेंडावंदन करणाऱ्या स्त्रिया, अजेंडा वाचून प्रश्न विचारणाऱ्या स्त्रिया, ग्रामीण विकासाकडे लक्ष देणाऱ्या स्त्रिया यातून निर्माण झाल्या आहेत. त्यामुळेच स्थानिक लोकांनी त्यांच्यावर नेतृत्वाची जबाबदारी टाकली आहे, व ती जबाबदारी त्या योग्यरितीने पार पाडत आहेत.

## आर्थिक क्षेत्रात योगदान

पंचायत राज्य व्यवस्थेतील महिलांच्या सहभागामुळे त्या पूर्वीसारख्या आर्थिकदृष्टया पुरूषांवर अवलंबून न राहता त्यांनी स्वयंसहायता गटाची निर्मिती केली आहे. त्याद्वारे विविध व्यावसायिक उपक्रम सुरू केले आहे. अंगणवाडी खिचडी शिजविण्यापासून ते पापड लोणची, मसाल्याचे पदार्थ, छोटया वस्तू बनविण्याचे उद्योग महिलांनी सुरू केले आहे. अलिकडे तर सहकारी साखर कारखाने चालविण्यापर्यत बचत गटांनी धाडस दाखवले आहे. गारमेंट उद्योग व समुह शेती सारख्या मोठया उद्योगात महिला आपले योगदान देत आहे.

## प्रशासकीय क्षेत्रात योगदान

महिलांच्या बदलत्या भूमिकेमुळे भारतीय समाज विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. ज्या ज्या ठिकाणी महिला काम करत आहेत, त्या त्या ठिकाणी भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी दिसत

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

आहे. देशात महिला सरपंच, पंचायत समिती सभापती, नगराध्यक्ष, महापौर, जिल्हा परिषद अध्यक्ष पदावर काम करत आहेत. तेही पुरूष प्रतिनिधीच्या सोबत बसून निर्णय प्रक्रियेत आपला ठसा उमटवताना दिसत आहे. प्रशासन व्यवस्था सक्षम करण्यात महिला प्रतिनिधीं विशेष पुढाकार घेताना दिसत आहेत. विविध कामांची अंमलबजावणी करण्यातही त्या सहभागी होत आहेत.

**समारोप**

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना पुरूषांबरोबरीने समान आरक्षण दिल्यामुळे त्यांचा विकास प्रक्रियेत सहभाग वाढतांना दिसत आहे. महिलांच्या सामाजिक व आर्थिक सबलीकरणाला व विकासाला चालना मिळत आहे. महिलांना त्यांच्या अधिकारांबाबत जाणीव जागृती झाली असल्याने त्या आपले हक्क मिळवत आहेत व त्यांची अमंलबजावणीही करत आहे. त्यांना मिळालेल्या संधीचा योग्य लाभ उठवत आहेत. महिलांच्या पंचायत राज व्यवस्थेतील सहभागामुळे त्यांच्यात राजकीय, सामाजिक व आर्थिक जागृकता वाढली आहे. त्यामुळेच त्यांचे राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील योगदान वाढले आहे. प्रशासन भ्रष्टाचार मुक्त व सक्षम करण्यात त्यांचा पुढाकार वाढतांना दिसत आहे. अनूसूचित जाती व जमातीच्या महिलाही निर्णय प्रक्रीयेत सहभागी होत आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाप्रमाणेच महिलांना विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा व राज्यसभेत पुरूष प्रतिनिधीं इतकेच म्हणजे ५०: आरक्षण दिल्यास महिलांचे खऱ्या अर्थाने सबलीकरण होऊन त्यांना समान न्याय मिळायला मदत होईल.

**संदर्भ**

१) डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण – भारतीय गणराज्याचे शासन व राजकरण, पिंपळापुरे पब्लीशर्स, नागपूर

२) डॉ. हिंगोले रेखा – महिला सक्षमीकरण समस्या व उपाय, इशा प्रकाशन, लातूर

३) पळसीकर सुहास व बिरबल नितीन – महाराष्ट्राचे राजकारण, राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे

४) डॉ. देशमुख अलका – भारतीय शासन व राजकारण, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

५) पाटील बी.बी. – भारतीय शासन व राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर